# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## (पुर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. ९० /२०२३

**विषय : विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकास होण्याच्या दृष्टीकोणातून महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याकरीता "Equal Opportunity Center" (समान संधी केंद्र) स्थापन करण्याबाबत..**

**संदर्भ : समाज कल्याण आयुक्तालय, ३ चर्च पथ, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्र. सकआ/ शिक्षण/भासशि/का-४ब/नस्ती क्र. ९१/२०२१/२०२१-२२/६८६, दिनांक ११/०२/२०२२.**

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रास अनुसरून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी सलंग्नित सर्व महाविद्यालये/ परिसंस्था यांना कळविण्यात येते की, मा. आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होण्याच्या दृष्टीकोनातून महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याकरीता Equal Opportunity Centre (समान संधी केंद्र) स्थापन करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

सदर आदेशाची प्रत या परिपत्रकासोबत जोडण्यात आलेली असून उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रास अनुसरून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये /परिसंस्था यांना कळविण्यात येते की, विहीत पध्दतीने Equal Opportunity Centre (समान संधी केंद्र) स्थापन करण्याबाबत मा. आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य यांनी दिलेल्या निर्देशानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

**गणेशखिंड, पुणे-४११००७ )**
**जा. क्र. :आरक्षण/** ओ-२२/३५६ **)**
**दिनांकः** २९/०५/२०२३ **)**

**डॉ. प्रफुल्ल अ. पवार**
**कुलसचिव**

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी:-**

१. मा.प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यता प्राप्त परिसंस्था पुणे, अहमदनगर व नाशिक

} आपणास निर्देशित करण्यात येते की, परिपत्र महाविद्यालय/ परिसंस्थेत दर्शनी भागात लावण्यात यावे. तसेच महाविद्यालयांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

E:\CBD\2023\Circular.docx

महाराष्ट्र शासन

# समाज कल्याण आयुक्तालय, ३ चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, पुणे-१

दूरध्वनी क्र.२०-२६१२७०६६ ईमेल - directorsocialfare@yahoo.co.in

क्र.सकआ/शिक्षण/मासशि/का-४ब/नस्ती क्र. ९१/२०२१/२०२१-२२/८८८ दि. १७ /०२/२०२२

प्रति,

१) प्रादेशिक उपायुक्त,
समाज कल्याण विभाग, पुणे.

२) सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण, पुणे विभाग सर्व.

**विषय:** विद्यार्थ्यांच्या सर्वांगिन विकास होण्याच्या दृष्टीकोणातून महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याकरीता "Equal Opportunity Center" (समान संधी केंद्र) स्थापन करणेबाबत...

**संदर्भ :** १) मा.मंत्री महोदय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय मुंबई-३२ यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १२ ऑगस्ट,२०२१ रोजी झालेली व्हीडीओ कॉन्फरन्स

२) आयुक्तालयाचे पत्र क्र. सकआ/शिक्षण/मासशि/का-४ब९१ ,नस्ती क्र//२०२१/ २०२१-२२/४५८, दि .२८/०१/२०२२

वरील विषयी मा. मंत्री महोदय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय मुंबई-३२ यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १२ ऑगष्ट, २०२१ रोजी झालेल्या व्हीडीओ कॉन्फरन्स बैठक व संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने कळविण्यांत येते की, महाविद्यालयातील मागासवर्गीय मुला-मुलींना शिष्यवृत्ती /फ्रीशिप इत्यादी योजना व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन सोबतच उद्योजकता, व्यवसाय, रोजगार निर्मितीसाठी - आर्थिक न्यायासाठी मार्गदर्शन - संवाद अभियान तसेच युवा संवाद - कार्यक्रम सुरु करण्याकरीता महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याकरीता "Equal Opportunity Center" (समान संधी केंद्र) स्थापन करणे आवश्यक असल्याचे निर्देशित केले आहे.

त्याचप्रमाणे केंद्र शासन पुरस्कृत भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेच्या सुधारीत मार्गदर्शक सूचनांमध्ये देखील शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासह त्याचे सर्वांगिन विकास व व्यवसाय / रोजगार निर्मितीच्या दृष्टीकोणातून राज्य शासनांनी विशेष उपाययोजना करणेबाबत निर्देशित केले आहे.

त्या अनुरोधाने प्रत्येक महाविद्यालयात त्यांच्या महाविद्यालयातील किमान एक प्राध्यापक व त्यांना " सहाय्यक म्हणून काही विद्यार्थी यांची मदत घेऊन महाविद्यालयातEqual Opportunity Center" स्थापन करावेत व त्यांना पुढील उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहित करण्याची आवश्यकतारोजगार प्राप्तीसाठी किंवा , उद्योजकता व व्यावसायिक होण्यासाठी कौशल्य शिक्षण या सर्व बाबींसह सर्वसमावेशक मार्गदर्शन करण्यांत याकरिता .यावेतसदर उपक्रम प्रभावीरित्या राबविण्याकरीता महाविद्यालयांतील ""Equal Opportunity Center" (समान संधी केंद्र) स्थापन करण्याकरीताची संरचना, सदर केंद्राचे कामकाज करण्याची कार्यपध्दती तसेच समान संधी केंद्राव्दारे करण्यांत आलेल्या कामाचे संबधीत जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय यांच्याशी करावयाचे समन्वय तसेच झालेल्या कामाचे मुल्यांकन इत्यादी बाबींचे धोरण विभागाव्दारे निश्चित करणे आवश्यक आहे. त्यानुरोधाने सदरील उपक्रमाचे अभ्यास करुन धोरण निश्चित करणे याकरिता खालील प्रमाणे समिती गठीत करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | नांव, पदनाम व कार्यालय | | समितीतील पद |
|---|---|---|---|
| १) | श्री. बाळासाहेब सोळंकी, प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, पुणे | : | अध्यक्ष |
| २) | श्रीमती. संगिता डावखर, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण पुणे | : | सदस्य |
| ३) | श्री. विशाल लोंढे, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, कोल्हापूर | : | सदस्य |
| ४) | श्री. नितीन उबाळे, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, सातारा | : | सदस्य |
| ५) | श्री. जयंत चाचरकर, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, सांगली | : | सदस्य |
| ६) | श्री. कैलास आढे, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, सोलापूर | : | सदस्य-सचिव |

तरी उपरोक्त समितीने राज्यातील महाविद्यालयांमध्ये स्थापन करण्यात येणा-या "Equal Opportunity Center" (समान संधी केंद्र) याचे कामकाजाबाबत सविस्तर धोरण निश्चित करणेबाबत स्वतंत्र अहवाल दिनांक १८ फेब्रुवारी, २०२२ पर्यंत समाज कल्याण आयुक्तालयास सादर करावा.

(डॉ. प्रशांत नारनवरे)
आयुक्त, समाज कल्याण
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत:-माहितीस्तव सविनय सादर.

१) मा. मंत्री महोदय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय मुंबई-३२ यांचे स्विय सहाय्यक.
२) मा. अपर मुख्य सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.